# कोर्ट विद्यमान अपर आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे समोर.

प्रकरण क्र.--२५---/एसआरव्ही-४३/मौजा-नागपूर/२०१६-१७.

| | | |
|---|---|---|
| अपीलार्थी | :- | गोल्डब्रिक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>तर्फे श्री.प्रतिक सरावजी,<br>राहणार- आनंदम वर्ल्ड सिटी,<br>कचाना रोड, रायपूर-७१. |
| | | -- विरुध्द -- |
| गैरअपीलार्थी | :- | १. नगर भुमापन अधिकारी क्र.१, नागपूर.<br>२. जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, नागपूर.<br>३. उपविभागीय अधिकारी, नागपूर. |

## आदेश

(पारित दिनांक १३ जुलै, २०१७)

अपीलार्थी गोल्डब्रिक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. तर्फे श्री.प्रतिक सरावजी, राहणार- आनंदम वर्ल्ड सिटी, कचाना रोड, रायपूर-७१ यांनी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अंतर्गत उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी मौजा-नागपूर येथील प्रकरणात दिनांक १३.०३.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशाविरुध्द अपील अर्ज तसेच स्थगनादेश मिळण्याबाबतचा अर्ज दिनांक १३.७.२०१७ रोजी दाखल केला आहे.

अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या स्थगनादेश मिळण्यासंबंधाचे अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.७.२०१७ रोजी अपीलार्थी यांचे अधिवक्ता श्री.जग्यासी यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अपीलार्थी यांनी स्थगनादेश मिळण्यासंबंधाने अर्जात नमूद केलेले कारण योग्य तसेच संयुक्तिक वाटत असल्यामुळे व त्यांचे युक्तीवादात तथ्य आढळून येत असल्यामुळे **अपीलार्थी यांनी दाखल केलेला स्थगनादेश मिळण्यासंबंधाने सादर केलेला अर्ज मंजूर करण्यात येऊन गैरअपीलार्थी प्रकरणात उपस्थित होईपर्यत स्थगनादेश मंजूर करण्यात येत आहे.**

13/7/17

(आर.एस.जगताप)
अपर आयुक्त, नागपूर विभाग,
नागपूर.

अपर आयुक्त, नागपूर विभाग